**Pimpri Chinchwad Police Commissionerate**

## प्रेसनोट दिनांक २१/०६/२०२१

## सराईत तडीपार गुन्हेगारास २ पिस्टल व ५ काडतुसासह अटक

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे, फरारी, तडीपार व गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन, त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन वचक निर्माण करणे बाबत सुचना व मौखिक आदेश दिल्याने, त्याअनुषंगाने खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या अधिपत्याखाली पोलीस उप-निरिक्षक महेंद्र पाटील व शाकीर जिनेडी हे स्टाफसह रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत सांगवी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत फिरत असताना, रक्षक चौक पिंपळे निलख पुणे येथे आले असता, पोलीस अंमलदार **संदीप पाटील व सुधीर डोळस** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार नामे मोहम्मद कोरबु हा औंध ऊरो रुग्नालयाचे मागील बाजुस, बा.रा घोलप कॉलेज जवळ, सांगवी पुणे येथे थांबलेला असुन त्याचे जवळ पिस्टल आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली असता, सदर माहिति वरीष्ठांना कळवून, त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे, मिळालेल्या बातमीचे ठिकाणी सापळा लावला असता, मिळालेल्या बातमीतील वर्णनाप्रमाणे व पोलीसांचे रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार मोहम्मद कोरबु हा कोणाची तरी वाट पाहत थांबलेला दिसला, तो पळुन जाणार नाही याची खबरदारी घेवुन, त्यास ताब्यात घेवुन, नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव मोहम्मद उर्फ मम्या मेहबुब कोरबु वय २३ वर्षे रा. उर्वेला हौसींग सोसायटी, बिल्डींग नं ५, रुम नं २०३, ओटा स्किम निगडी पुणे असे सांगितले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला **१ देशी बनावटीचे पिस्टल व ०३ जिवंत काडतूसे असा ४०,६००/- रुपये किंमतीचा** माल मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला असून, त्याचे विरुध्द **सांगवी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर २०५/२०२१ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १४२, ३७(१)(३) सह १३५** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार असल्याने त्याची पोलीस कोठडीची रिमांड घेवून तपास करता, त्याचेकडून आणखी किंमत **४०,४००/- रुपयेचे ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतूसे असा माल हस्तगत करण्यात आले. असे नमूद आरोपी कडून किंमत ८१,०००/- रुपयेचे ०२ पिस्टल व ०५ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहे.**

**आरोपी मोहम्मद उर्फ मम्या मेहबुब कोरबु हा पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन, त्याचे विरुध्द निगडी पोलीस ठाणे खून, खुनाचा प्रयत्न, मारमारी असे एकुण ०५ गुन्हे दाखल असून त्यास दिनांक ३१/१०/२०२० रोजी पासून दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आले होते. त्याचेवर दाखल असलेले गुन्हे खालीलप्रमाणे,-**

**१) निगडी पोलीस ठाणे गुरनं २२/२०१५ भादवि कलम ३०७, ४३९, १४३, १४७, १४८, १४९, ५०७**

**२) निगडी पोलीस ठाणे गुरनं १०९/२०१५ भादवि कलम ३०२, २०१, ३६३, ३६४, ३६८, ५०४, ५०६, १४३, १४८, १४९, १२०(ब)**

**३) निगडी पोलीस ठाणे गुरनं २८/२०१८ भादवि कलम ३२६, ३२४, १४३, १४४, १४७, १४८, १४९, आर्म ॲक्ट ४(२५) व महा. पो. का. कलम ३७९(१)(३) सह १३५**

**४) निगडी पोलीस ठाणे गुरनं ५२०/२०१८ भादवि कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ आर्म ॲक्ट ४(२५)**

**५) निगडी पोलीस ठाणे गुरनं ४५/२०२० भादवि कलम ३९४, ३४ आर्म ॲक्ट ४(२५)(२७)**

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, शाकीर जिनेडी, तसेच पोलीस अंमलदार, संदीप पाटील, सुधीर डोळस, शैलेश मगर, अशोक दुधवणे, सुनिल कानगुडे, निशांत काळे, किरण काटकर, प्रदीप गोडांबे, विजय नलगे, अशोक गारगोटे व प्रदीप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.